वर्ष-०८ | अंक-४७ | मुंबई, मंगळवार ११ ते १७ ऑक्टोबर - २०२२ | पृष्ठ-४
मूल्य २/- रुपये
ठाणे आवृत्ती
मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133
POSTAL REGISTRATION
No.PLG/205/2022-2024

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र
●संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG 2
भिजवून-कोरडे-भाजलेले, साल किंवा सालीसह बदाम खाण्याचे प्रकार:हृदय निरोगी, BP कंट्रोल, स्मरणशक्तीत वाढ, वजन नियंत्रित

3 → आपला कोण, भारतीय शेतकरी की चिनी व्यापारी?
गुजरातमध्ये ड्रग्ज तयार करायचा अन् मुंबईत विकायचा, 7000 कोटींचं ड्रग्ज बनवणाऱ्या मास्टरमाईंडला .... ← 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

## शिवसेनेची चिन्हे यादीत नाहीत !; अपवादात्मक बाब म्हणून मंजुरीची आयोगाकडे मागणी



मुंबई : शिवसेनेने त्रिशूळ, उगवता सूर्य आणि मशाल या तीनपैकी एक चिन्ह मिळावे, अशी मागणी केली असली तरी निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केलेल्या उपलब्ध चिन्हांच्या यादीतच या तिन्ही चिन्हांचा समावेश नाही. परंतु यादीत उपलब्ध असलेली चिन्हे ही शिवसेनेचा विचारसरणी,

ध्येयधोरणांशी सुसंगत नसल्यानेच अपवाद म्हणून तीनपैकी त्रिशूळ चिन्ह मिळावे, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह गोठविण्यात आल्यावर शनिवारी रात्रीच शिवसेनेच्या वतीने तीन नावे आणि चिन्हांची यादी निवडणूक आयोगाला सादर करण्यात आली. निवडणूक आयोगाने सोमवार दुपारी १ पर्यंत तीन नावे व चिन्हांचा पर्याय सादर करण्याची सूचना शिवसेना व शिंदे गटाला केली आहे. शिवसेनेने त्रिशूळ,

उगवता सूर्य आणि मशाल या तीन चिन्हांचा पर्याय सादर केला आहे. निवडणूक आयोगाने २३ सप्टेंबर २०२१ रोजी उपलब्ध असलेल्या १९७ चिन्हांची यादी प्रसिद्ध केली होती. यातून तीन चिन्हांचा पर्याय सादर करणे अभिप्रेत असते. शिवसेनेने सादर केलेली तिन्ही चिन्हांचा उपलब्ध चिन्हांमध्ये समावेश नाही. शिवसेनेचे वकील विवेक सिंह यांनी निवडणूक आयोगाला सादर केलेल्या पत्रात यादीत ही तिन्ही चिन्हे नसली तरी अपवाद करावा, अशी मागणी केली आहे. चिन्ह कोणते असावे हे सुचविण्याबाबत कोणताही कायदेशीर अडथळा नाही, असा पत्रात दावा करण्यात आला आहे. निवडणूक आयोगाच्या यादीत उपलब्ध असलेली सर्व चिन्हे ही शिवसेनेच्या आक्रमक अशी विचारसरणी, ध्येयधोरणे तसेच संस्कृतीशी सुसंगत नाहीत. तसेच त्रिशूळ हे चिन्ह कोणत्याही राष्ट्रीय तसेत राज्यस्तरीय पक्षाला वाटप झालेले नाही. यामुळेच शिवसेनेला त्रिशूळ या चिन्हाचे वाटप व्हावे, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

## बाळासाहेब ठाकरे यांच्या नावासाठी शिंदे गटाचाही दावा

### तुतारी, गदा, तलवार या तीनपैकी एक चिन्ह मिळावे, अशी मागणी शिंदे गटाच्या वतीने करण्यात येणार आहे.

मुंबई : पक्षाच्या नावावरूनही शिवसेना उद्धव ठाकरे गटाची कोंडी करण्याची खेळी शिंदे गटाने केली आहे. शिंदे गटाच्या वतीनेही शिवसेनेने मागणी केलेली बाळासाहेब ठाकरे यांच्याशी संबंधित दोन नावांवर दावा करण्यात येणार आहे.शिवसेनेने शिवसेना (बाळासाहेब ठाकरे), शिवसेना (बाळासाहेब प्रबोधनकार ठाकरे) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या तीन नावांचा पर्याय निवडणूक आयोगाला सादर केला आहे. शिंदे गटाने शिवसेना (बाळासाहेब ठाकरे), शिवसेना (बाळासाहेब प्रबोधनकार ठाकरे) ही दोन नावे निश्चित केली आहे. तिसरे नाव सोमवारी सकाळी अंतिम करण्यात येणार आहे. शिवसेनेला




काहीही करून बाळासाहेब ठाकरे यांचे नाव मिळू नये, असा शिंदे गटाचा प्रयत्न आहे. शिंदे गटाने सातत्याने बाळासाहेब ठाकरे यांचे विचार आम्ही पुढे घेऊन जात आहोत, असा दावा केला आहे. बाळासाहेब ठाकरे यांचे नाव शिवसेनेला वापरण्यास मिळाल्यास तो शिंदे गटाला त्रासदायकच ठरेल. शिवसेनेने निवडणूक आयोगाचे पत्र प्राप्त होताच लगेचच तीन नावे व चिन्हांची यादी सादर केली. शिंदे गट बाळासाहेबांचे नाव वापरणार याचा शिवसेना नेत्यांना अंदाज होता. म्हणूनच शिवसेनेने पहिला दावा आमचा आहे हे दाखविण्याकरिता शनिवारी रात्रीच यादी सादर केली होती. दोन्ही गटांनी एकाच नावावर दावा केल्यास दोन्ही गटांना ते नाव मिळणार नाही, अशी शिंदे गटाची योजना आहे.

शिंदे गटाची चिन्हे तुतारी, गदा, तलवार या तीनपैकी एक चिन्ह मिळावे, अशी मागणी शिंदे गटाच्या वतीने करण्यात येणार आहे. शिंदे गटाच्या वतीने सोमवारी सकाळी पक्षाची नावे व चिन्हांबाबतचे पत्र सादर करण्यात येणार आहे.

## घरफोडीच्या ' अज्ञात आरोपींची उकल करण्यात ' पोलीसांना यश



दि.०३/०८/२०२२ रोजी फिर्यादी नामे मिलींद अरविद करंदिकर रा. रामचंद्र निवास ब्राम्हणआळी डहाणु किल्ला, ता. डहाणु जि. पालघर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन, त्यांचे घराचे पहिल्या माळ्यावरील बेडरूमचे बाथरूमच्या काचा काढून त्यावाटे अज्ञात आरोपीत याने आतमध्ये प्रवेश करुन बेडरुममध्ये असलेल्या लोखंडी कपाटाचे लॉकरमध्ये ठेवलेले ८,१२,०००/रुपये किमतीचे सोन्या-चांदिचे दागीने फिर्यादी यांचे संमतीशिवाय घरफोडी चोरी करुन चोरुन नेलेबाबत डहाणु पोलीम ठाणे येथे गु.र.नं. । ११५/२०२२ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर यांचे आदेशान्वये श्री. प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार चिभाग, अतिरिक्त चार्ज डहाणु विभाज, श्री. शैलेश काळे, पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर, अतिरिक्त चार्ज डहाणु विभाग यांनी सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोनि/नामदेव बंडगर, प्रभारी अधिकारी डहाणु पोलीस ठाणे यांना वेगवेगळी तपास पथके तयार करुन मदर गुन्हयाच्या तपासाबायत सुचना दिल्या. त्या अनुषंगाने वेगवेगळी तपास पथके तयार करुन सदर गुन्ह्यात कोणताही पुरावा सोडला नसताना अथवा धागेदोरे नसताना कौशल्यपुर्ण तांत्रीक तपास करुन दोन संशयीत आरोपीना ताब्यात घेऊन त्यांची सखोल चौकशी केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याचे कबुल केले. नमुद गुन्ह्यात आरोपींत यांना अटक केली असून त्यांचेकडून चोरून नेलेल्या एकूण मुद्देमालापैकी ६,४८,३१५/रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. सदर PATE पुढील तपास हा पोउपनि/भरतेश हारुगिरे, नेमणुक डहाणु पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई श्री. बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक पालघर, श्री. प्रशांत परदेशी, उपविभागीय पोलीस अधिकारी, जव्हार विमाग, अतिरिक्त चार्ज डहाणु विभाग, श्री. शीलेश काळे, पोलीस उप अधीक्षक (गृह) पालघर, अतिरिक्त चार्ज इहाणु विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि/नामदेय बंडगर, प्रभारी अधिकारी इहाणु पोलीस ठाणे, सपोनि/व्हि. एम. नार्वेकर, पोउपनि/भरतेश हारुगिरे, सफौ/मुनिल नलावडे, पोहवा/ आर. ए. रासम, पोहवा/६२३ जे. जे. खांडवी, मपोना/एस. एन. कहार, पोशि/एस. बी. कदम सर्व नेमणुक इहाणु पोलीस ठाणे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.

## तरुणाची वृद्ध महिलेला बेदम मारहाण, कारण ऐकून हैराण व्हाल!




डोंबिवली : गर्दीत धक्का लागला म्हणून एका तरुणाने चक्क वृद्ध महिलेला बेदम चोपल्याचीधक्कादायक घटना डोंबिवलीत घडली आहे. याप्रकरणी रामनगर पोलिसांनी आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. सोहम संतोष सावंत असे 21 वर्षीय आरोपीचे नाव आहे. डोंबिवली पूर्वेकडील रेल्वे स्थानक परिसरात रविवारी संध्याकाळी हा प्रकार घडला. अंजली भोजी देवडिगा असे मारहाण झालेल्या 64 वर्षीय वृद्धेचे नाव आहे.

**स्टेशन परिसरात भाजीपाला खरेदीसाठी आली होती महिला**

डोंबिवली पूर्वेकडील रेल्वे स्थानक परिसर हा नेहमी गजबजलेला असतो. यामुळे या परिसरात नेहमी गर्दी असल्याने धक्काबुक्कीचे प्रकार नेहमी घडत असतात. रविवारी संध्याकाळी वृद्ध महिला रेल्वे स्थानक भागात भाजीपाला खरेदीसाठी आल्या होत्या. बाजारपेठेत खरेदी झाल्यानंतर त्या रामनगरमधील तुकारामनगर रिक्षा स्टँडकडे पायी चालल्या होत्या.

**सुट्टीचा दिवस असल्याने स्टेशन परिसरात गर्दी होती**

रविवार सुट्टीचा दिवस आणि त्यात खरेदीसाठी गर्दी असल्याने पायी चालताना अंजली यांचा धक्का बाजूने चाललेल्या दोन तरुणांना लागला. अंजली यांनी याबद्दल चूक मान्य केली. तरीही आपणास मुद्दाम धक्का मारला म्हणून सोहम सावंत याने अंजली यांना भररस्त्यात बेदम मारहाण सुरू केली. मारहाणीमुळे वृद्धेच्या शरीरावर जखमा यावेळी रस्त्यावरील इतर नागरिकांनी तरुणाला रोखण्याचा प्रयत्न केला. मात्र तरीही तो ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. हातामधील कड्याने तो या वृद्धेला मारहाण करत होता. या मारहाणीमुळे वृद्धेच्या अंगावर व्रण आणि जखमा झाल्या आहेत. सध्या महिलेवर उपचार सुरु आहेत.

**रामनगर पोलिसांकडून आरोपीला बेड्या**

याप्रकरणी जखमी वृद्धेने रामनगर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. वृद्धेच्या तक्रारीनंतर रामनगर पोलिसांनी तरुणाचा शोध घेत त्याला दिव्या जवळच्या दातिवली गावातील राहत्या घरातून बेड्या ठोकल्या. याबाबत फौजदार एस. जी. पाटील अधिक तपास करत आहेत.

## राऊतांचा कोठडीतील मुक्काम वाढला



मुंबई : पत्राचाळ घोटाळ्याप्रकरणी ईडीच्या कोठडीत असलेले खासदार संजय राऊत यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी पुन्हा पुढे ढकलली आहे. वेळे अभावी संजय राऊत यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी तहकूब करून पुढील सुनावणी १७ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता ठेवण्यात आली आहे. त्यामुळे त्यांचा कोठडीतील मुक्काम अजून वाढला आहे. संजय राऊतांच्या जामीन अर्जावर ५ ऑक्टोबर रोजी सुनावणी झाली होती. त्यामध्ये त्यांना १० ऑक्टोबर पर्यंत कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यानंतर आज वेळेअभावी त्यांच्या अर्जावर सुनावणी होऊ शकलेली नाही. पुढील सुनावणी १७ ऑक्टोबर रोजी होणार आहे.

## घरी बोलवून आधी दारुची पार्टी दिली नंतर कोयत्याने वार केले, कल्याणमध्ये मित्राकडून मित्राची हत्या




मुंबई : कल्याण पूर्वेतील तिसगावनाका येथे एक धक्कादायक प्रकार समोर आलाय. उसने घेतलेले पैसे परत देत नसल्याने मित्राने मित्राची हत्या केली आहे. बिपिन दुबे असे हत्या झालेल्या तरूणाचे नाव आहे. तर राजेश्वर पांडे असे संशयित आरोपीचे नाव आहे. या घटनेनंतर पोलिसांनी संशयित पांडे याला ताब्यात घेतले आहे. कोयत्याने वार करून ही हत्या करण्यात आलीय.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेश्वर पांडे याने त्याचा मित्र बिपिन दुबे याची कोयत्याने वार करत हत्या केली आहे. ही धक्कादायक घटना कल्याण पूर्व तिसगाव नाका परिसरात आज दुपारच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी कोळशेवाडी पोलिस ठाण्यात राजेश्वर पांडे विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्याला पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू केला आहे.

कल्याण पूर्व परिसरात तिसगाव नाका येथील एका इमारतीमध्ये राजेश्वर पांडे राहतो. याच परिसरात राहणारा बिपिन दुबे हा राजेश्वर पांडे याचा मित्र होता. बिपिन दुबे याने काही महिन्यांपूर्वी राजेश्वर पांडे याच्याकडून काही कामानिमित्त साडे चार लाख रुपये उसने घेतले होते. राजेश्वर याने अनेक वेळा बीपीनकडे पैशांची मागणी केली. मात्र बिपिन टाळाटाळ करत होता. आज दुपारी राजेश्वर याने बिपिनला घरी बोलावलं. दोघांनी दुपारच्या सुमारास मटन खाल्लं, मद्यपान केलं. त्यानंतर राजेश्वरने बिपीनकडे पैसे मागितले. परंतु, यामुळे दोघांमध्ये वाद झाला. या वादातून राजेश्वरने बिपिनवर कोयत्याने वार करत बीपीनची हत्या केली.

संशयिताने स्वत: पोलिसांना दिली माहिती धक्कादायक बाब म्हणजे राजेश्वर याने बिपीन याची हत्या केल्यानंतर त्याने स्वत: कोळशेवाडी पोलिस ठाण्यात फोन करून मी बिपीनची हत्या केल्याचं सांगितलं. घटनेची माहिती मिळताच कोळशेवाडी पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. मयत बीपीनचा मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला आहे.

तर आरोपी राजेश्वर पांडे याला कोळशेवाडी पोलिसांनी अटक केली असून पुढील तपास सुरू केला आहे, अशी माहिती कोळशेवाडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेंद्र देशमुख यांनी दिली.

## बँकेच्या तिजोरीवर डल्ला; 12 कोटींची रोकड पळविणाऱ्या मॅनेजरला अटक

डोंबिवली : बँकेत कामावर असताना व फावल्या वेळात बँक दरोडा विषयी युट्यबुवरून वेब सिरीज पाहून फिल्मी स्टाईलने बँकेच्या तिजोरीवर डल्ला मारून १२ कोटींची रोकड पळविणाऱ्या बँकेच्या कॅश कस्टोडियन मॅनेजरला मानपाडा पोलिसांना अडीच महिन्याच्या तपासानंतर पुण्यातून अटक केली आहे.

अल्ताफ शेख (४३) असे अटक केलेल्या कॅश कस्टेडियन मॅनेजरचे नाव आहे. त्याला गुन्ह्यात मदत करणाऱ्या ३ साथीदारांसह त्याच्या बहिणीला अटक करण्यात आली आहे.

डोंबिवलीतील एमआयडीसीच्या निवासी विभागात आयसीआयसीआय बँकेची शाखा आहे. या बँकेत मुख्य आरोपी अल्ताफ हा कॅश कस्टोडियन मॅनेजर म्हणून नोकरी करत होता. झटपट श्रीमंत होण्यासाठी बँकेतील तिजोरीत असलेल्या कोट्यवधी रुपयांवर डल्ला मारण्याचा वर्षभरापूर्वी कट रचला होता. याकरिता तो बँक दरोड्याच्या वेब सिरीज पाहत होता. चोरीसाठी लागणारे साहित्य गोळा केल्यानंतर ९ जुलै रोजी सुट्टीचा दिवस त्याने चोरीसाठी निवडला. प्रथम त्याने अलार्म



निष्क्रिय केला. सर्व कॅमेऱ्यांच्या हार्ड डिस्क काढून टाकल्या आणि तिजोरीतून ३४ कोटी रुपये त्याने एसीच्या डक्टमधून बनवलेल्या छोट्या छिद्रातून ही रोकड बँकेच्या इमारतीच्या मागील बाजूस असलेल्या कचरापेटीनजीक ताडपत्रीने झाकून ठेवली. याबाबत पोलिसांनी सांगितले की, बँकेत ११ वर्षे काम करणाऱ्या अल्ताफचा कोणताही गुन्हेगारी रेकॉर्ड नाही. तांत्रिक माहिती गोळा केली पण एकही सुगावा सापडला नाही. पोलीस यंत्रणा तपास करत असतानाच मुख्य आरोपीचे दरोडा व चोऱ्या या सारख्या गुन्ह्यांचे चित्रपटांबद्दल असलेले त्याचे वेड समोर आले. बँक दरोडा आणि चोरीच्या अनेक वेब सिरीज व चित्रपट पाहिले असता पैसे कचऱ्याच्या ढिगाऱ्यात नेण्यासाठी एसी डक्ट गॅस कटरने कापून मोठा करून आणि सीसीटीव्ही फुटेजशी छेडछाड करून त्याने संपूर्ण चोरीची योजना कशी आखली हे पोलिसांना समजू लागले. शिवाय चोरी करताना पकडले जाऊ नये म्हणून चेहरा लपण्यासाठी आरोपी अल्ताफ शेख हा बुरखा वापरत होता. लूक कसा बदलायचा हे देखील तो वेब सिरीज पाहून शिकला असल्याचे पोलीस तपासात समोर आले.

## ठाण्यात धूर आणि धूळ प्रदूषण करणाऱ्यांवर होणार दंडात्मक कारवाई

ठाणे : महापालिका क्षेत्रातील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी डायघर येथील प्रकल्पाचे काम पुर्ण होईपर्यंत पालिका हद्दीबाहेर म्हणजेच भंडर्ली येथे तात्पुरता प्रकल्प प्रशासनाने उभारला असून, त्यापाठोपाठ आता उघड्यावरील कचरा आणि बायोमास जाळणे तसेच बांधकाम साहित्य कचऱ्यामुळे प्रदूषण करणाऱ्यांवर यापुढे स्वच्छ कृती आराखडा अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेतला आहे. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी कारवाईचे अधिकार विभागीय अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांना दिले आहेत. ५ हजार ते २५ हजार रुपयांपर्यंतचा दंड आकारण्यात येणार आहे. ठाणे शहर धूळ प्रदूषणापासून मुक्त रहावे यासाठी आयुक्तांनी हा निर्णय घेतला आहे. ठाणे महापालिका क्षेत्रातील कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून डायघर येथे कचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावून त्यापासून वीज निर्मीतीचा प्रकल्प उभारण्याचे काम सुरु आहे. त्याचबरोबर या प्रकल्पाचे काम पुर्ण होईपर्यंत पालिका हद्दीबाहेर म्हणजेच भंडर्ली येथे तात्पुरता प्रकल्प प्रशासनाने उभारला आहे. याठिकाणी कचरा विल्हेवाटीचे काम सुरु झाल्याने पालिकेने दिवा कचराभुमीवर कचरा टाकणे बंद केले आहे. त्याचबरोबर स्वच्छ कृती आराखडा अंतर्गत पालिका प्रशासनाकडून



शहरात धुळ आणि धूर प्रदुषण रोखण्यासाठी यंत्रणा उभारण्यात येत असून त्यापाठोपाठ आता शहरात धुर आणि धूळ प्रदूषण करणाऱ्यांवर स्वच्छ कृती आराखडा अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय महापालिका आयुक्त अभिजीत बांगर यांनी घेतला आहे. त्यासाठी त्यांनी नियमावली तयार करत या कारवाईचे अधिकार विभागीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिले आहेत. नियमावलीनुसार ठाणे महापालिका क्षेत्रात उघड्यावर कचरा जाळल्यास पाच हजार रुपये दंड आकरण्यात येणार असून ही कारवाई प्रदूषण नियंत्रण विभागामार्फत करण्यात येणार आहे. तर, उघड्यावर कचरा जाळण्याचे कृत्य मोठे असेल तर, संबंधितांवर २५ हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्यात येणार असून या कारवाईचे अधिकार घनकचरा व्यवस्थापन विभागाला असणार आहे. बांधकाम साहित्य कचऱ्याच्या विना आच्छादन वाहनाद्वारे वाहतूक करून धूळ प्रदूषण केले तर, ५ हजार रुपये दंड, बांधकाम साहित्य कचरा वाहनाद्वारे रस्त्यावर, रस्त्याच्या कडेला, सार्वजनिक ठिकाणी, खाजगी जागेत अनधिकृतपणे टाकल्यामुळे होणाऱ्या धूळ प्रदूषणासाठी प्रति टन ५ हजार रुपये आणि बांधकाम साहित्य कचऱ्यामुळे होणाऱ्या धूळ प्रदूषणासाठी २५ हजार रुपये दंड वसुल करण्यात येणार आहे.

# रात्री झोप येत नाही?



मराठीमध्ये अनिद्रा किंवा निद्रानाश असे म्हटले जाते. हा एक झोपेसंबंधी विकार आहे, ज्यामध्ये एखाद्याला झोपच लागत नाही. झोपेची पुरेशी संधी व वेळ असूनही या आजारात झोप लागत नाही. उदाहरणार्थ, रात्री झोपण्याची वेळ उलटून गेली व आपण अंथरुणावर असू तरीही झोप लागत नाही.

मराठीमध्ये 'अनिद्रा' किंवा 'निद्रानाश' असे म्हटले जाते. हा एक झोपेसंबंधी विकार आहे, ज्यामध्ये एखाद्याला झोपच लागत नाही. झोपेची पुरेशी संधी व वेळ असूनही या आजारात झोप लागत नाही. उदाहरणार्थ, रात्री झोपण्याची वेळ उलटून गेली व आपण अंथरुणावर असू तरीही झोप लागत नाही.

विस्कळीत दैनंदिनी हे निद्रानाशाचे एक महत्त्वाचे कारण आहे. निद्रानाश हा पुरुषांपेक्षा स्त्रिया, वृद्ध व तरुणांमध्ये जास्त आढळून येतो. कोरोनाच्या संकटसमयी अनेकांचे मानसिक स्वास्थ्य असंतुलित झाले होते. बदललेले दैनंदिन जीवन, सतत असलेले भीतीचे सावट, जवळच्या व्यक्तींचे मृत्यू व त्यामुळे आलेले औदासिन्य, मोबाइल, टेलिव्हिजन यासारख्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा अतिवापर या सर्व गोष्टींचा परिणाम अनेकांच्या निद्रानाश या समस्येसाठी कारणीभूत ठरला. निद्रानाशामुळे शारीरिक तसेच मानसिक आरोग्याला मोठा धोका असतो. अनिद्रेमुळे शारीरिक आजार तर उद्भवतातच; परंतु त्याचबरोबर मानसिक आजारांना देखील निमंत्रण मिळते.

**निद्रानाशाची कारणे:-** विस्कळीत दैनंदिनी, अति ताण, चिंता विकार, मानसिक आजार, दीर्घकालीन शारीरिक आजार, आयुष्यावर परिणाम करणारी एखादी अप्रिय घटना घडणे, जवळच्या व्यक्तीचे निधन, घटस्फोट, रात्रपाळीची अथवा फिरतीची नोकरी, वेगवेगळ्या टाइम झोनमध्ये फिरती, मोबाइलचे व्यसन, अन्य व्यसनाधीनता.

**निद्रानाशाची लक्षणे:-** रात्री झोपेत अडचण येणे, वारंवार जाग येणे व नंतर झोप न लागणे, खंडित झोप, दिवसभर थकवा जाणवणे, दिवसभर झोपाळल्यासारखे वाटणे, डोळ्यांवर गुंगी येणे, उदासीनता जाणवणे, चिडचिड, आक्रमकता, एकाग्रता व लक्ष केंद्रित करण्यात अडथळा, डोकेदुखी अथवा अर्धशिशीचा त्रास, सामाजिक व्यवहारांमध्ये अडचणी, मानेचे आजार, सायकोसोमॅटीक आजार.

**उपाय:-** झोप लागत नसेल तरीही पुरेशी विश्रांती घेणे. ताबडतोब तज्ज्ञ व्यक्तींच्या सल्ल्याने औषधोपचार सुरू करणे. जीवनशैलीत योग्य तो बदल करणे. झोपण्याच्या व उठण्याच्या वेळा निश्चित करणे. रात्री झोपताना मधुर व आरामदायी संगीत ऐकणे. रात्री झोपण्याच्या आधी उत्तेजना देणारे चहा, कॉफी इत्यादींसारख्या पेयांचे सेवन टाळणे. संध्याकाळनंतर मद्यपान व धूम्रपान टाळणे. झोपण्याच्या आधी काही वेळ इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स व टेलिव्हिजन पाहणे टाळणे. योग्य व संतुलित आहार घेणे. वेळेत उपचार घेतल्यास निद्रानाश हा आजार आटोक्यात आणता येऊ शकतो. योग्य औषधोपचार व समुपदेशन घेणे अत्यावश्यक असते.

**जीवनसत्त्वाच्या कमतरतेमुळे निद्रानाश:-** रात्री उशिरा अंथरुणावर पडूनही जर तुम्हाला लवकर झोप येत नसेल, तर याचे कारण शरीरात व्हिटॅमिन डीची कमतरता असू शकते. खरं तर, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे शारीरिक आणि मानसिक थकवा येतो. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, व्हिटॅमिन डीच्या कमतरतेमुळे निद्रानाश होऊ शकतो किंवा झोपेची पद्धत बिघडू शकते. व्हिटॅमिन डीच्या पुरवठ्यासाठी, तुम्ही सॅल्मन फिश, अंड्यातील पिवळे बलक, सोया दूध, गाईचे दूध आणि मशरूम घेऊ शकता.

# महिलांमध्ये बी १२ ची कमतरता

शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यासाठी दररोज पुरेशा प्रमाणात पोषक तत्त्वांची आवश्यकता असते. यासाठी, सर्व प्रकारची जीवनसत्त्वे, प्रथिने, खनिजे सहजपणे पुरवू शकणारे पदार्थ निवडण्याचा सल्ला दिला जातो. पण शरीराला आवश्यक असणारी ही सर्व पोषकतत्त्वे सर्व लोकांना आहारातून मिळू शकतात का? तर उत्तर आहे, नाही.



शरीराला चांगल्या प्रकारे कार्य करण्यासाठी दररोज पुरेशा प्रमाणात पोषक तत्त्वांची आवश्यकता असते. यासाठी, सर्व प्रकारची जीवनसत्त्वे, प्रथिने, खनिजे सहजपणे पुरवू शकणारे पदार्थ निवडण्याचा सल्ला दिला जातो. पण शरीराला आवश्यक असणारी ही सर्व पोषकतत्त्वे सर्व लोकांना आहारातून मिळू शकतात का? तर उत्तर आहे, नाही. अभ्यास आणि अहवाल सूचित करतात की उत्तर भारतातील ४७ टक्के लोकसंख्येमध्ये व्हिटॅमिन बी १२ ची कमतरता आहे. भारतातील ७० टक्क्यांपेक्षा जास्त प्रौढांमध्ये, विशेषतः महिलांमध्ये व्हिटॅमिन बी१२ ची कमतरता दिसून येते.

व्हिटॅमिन बी-१९ च्या कमतरतेमुळे शरीरात अनेक प्रकारच्या समस्या वाढू शकतात. व्हिटॅमिन बी-१२ (सामान्यतः फोलेट म्हणतात) च्या कमतरतेमुळे ॲनिमिया होऊ शकतो. या स्थितीत अति थकवा, ऊर्जेचा अभाव (आळस), श्वास लागणे, मूर्च्छा येणे, डोकेदुखी यासारख्या समस्या उद्भवू शकतात. आहारात काही गोष्टींचा समावेश करून या जीवनसत्त्वाची गरज सहज पूर्ण करता येऊ शकते, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. जाणून घेऊया यासाठी कोणत्या गोष्टींचे सेवन करावे.

**डेअरी उत्पादनांमधून व्हिटॅमिन बी-१९ मिळवा :** दूध आणि इतर दुग्धजन्य पदार्थ जसे की दही आणि चीज, प्रथिने तसेच व्हिटॅमिन बी १२ आणि इतर विविध खनिजे यांचा चांगला स्रोत आहेत. एक कप (२४० मिली) दूध व्हिटॅमिन बी १२ साठी दैनंदिन गरजेच्या ४६ टक्के पुरवते. याशिवाय १०० ग्रॅम पनीरमध्ये ८०० मिलीग्राम व्हिटॅमिन-बी१२ असते. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की आहारात दुग्धजन्य पदार्थांचा समावेश करून तुम्ही त्याची कमतरता दूर करू शकता.

**मशरूमचे फायदे :** मशरूममध्ये विविध प्रकारच्या पोषक तत्त्वांचा समावेश असतो, त्यापासून व्हिटॅमिन बी-१२ देखील मिळवता येते. १०० ग्रॅम मशरूमपासून ते ५.६ मायक्रोग्रॅम प्रमाणात पुरवले जाऊ शकते. याशिवाय प्रथिने आणि कॅल्शियम सारख्या पोषक घटकांसाठी आहारात मशरूमचा समावेश करणे देखील फायदेशीर मानले जाते. शाकाहारी लोकांसाठी मशरूम खाणे विशेषतः फायदेशीर मानले जाते.

**अंडी आरोग्यासाठी उपयुक्त :** अंडी सामान्यतः त्यांच्या प्रथिनांसाठी ओळखली जातात, परंतु तुम्हाला माहीत आहे का की १०० ग्रॅम अंडी तुमची ४६ टक्के व्हिटॅमिन-बी१२ ची रोजची गरज पूर्ण करू शकतात. संशोधनात असे दिसून आले आहे की अंड्यातील पिवळ्या बलकामध्ये व्हिटॅमिन बी १२ ची पातळी अंड्याच्या पांढऱ्यापेक्षा जास्त असते. अंड्यातील पिवळ्या बलकामध्ये असलेले इ१२ शरीराला शोषून घेणे देखील सोपे आहे. आहारात अंड्यांचा समावेश करणे आवश्यक आहे.

**व्हिटॅमिन बी -१२ फळे :** अनेक प्रकारच्या फळांमध्ये व्हिटॅमिन बी-१२ मुबलक प्रमाणात आढळते. उदाहरणार्थ, बी१२ व्यतिरिक्त, सफरचंद देखील अँटिऑक्सिडंट्स, फ्लेव्होनॉइड्स आणि फायबरने समृद्ध असतात. त्याचप्रमाणे, केळी हे व्हिटॅमिन-बी१२ समृद्ध फळांपैकी एक आहे. अननस आणि अंजीरमध्येही या पोषक तत्त्वाचे प्रमाण आढळते. या फळांचा आहारात समावेश करणे फायदेशीर ठरू शकते.

# 'या' व्हिटॅमिनची कमतरता ठरू शकते घातक!



शरीराचे कार्य उत्तमरीत्या चालू ठेवण्यासाठी आणि अवयव निरोगी आणि तंदुरुस्त ठेवण्यासाठी जीवनसत्त्वे आणि पोषकतत्त्वे आवश्यक असतात. हेच कारण आहे की आरोग्य तज्ज्ञ सर्व लोकांना दररोज निरोगी आणि पौष्टिक पदार्थांचे सेवन करण्याचा सल्ला देतात. शरीराला आवश्यक असलेली बहुतांश पोषकतत्त्वे हिरव्या भाज्या-हंगामी फळांपासून मिळू शकतात. खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये गडबड झाल्यामुळे अनेक प्रकारच्या जीवनसत्त्वांच्या कमतरतेची समस्या बहुतांश लोकांमध्ये दिसून आली आहे. डोळे, त्वचा ते केस, स्नायू, हाडे यांच्या उत्तम आरोग्यासाठी पौष्टिक आहार घेणे आवश्यक मानले जाते.

तुम्हालाही लहानपणापासूनच डोळ्यांशी संबंधित समस्या, जसे की कमी दृष्टी, अस्पष्टता किंवा त्वचा कोरडेपणाचा सामना करावा लागत आहे? अशा समस्यांमागे व्हिटॅमिन एची कमतरता हे मुख्य कारण असल्याचे तज्ज्ञ मानतात. दुर्दैवाने, बहुतेक लोकांना रोजच्या आहारातून पुरेसे व्हिटॅमिन ए मिळत नाही, ज्यामुळे अशा समस्यांचा धोका असू शकतो. व्हिटॅमिन-ए ची कमतरता आपल्यासाठी कशी घातक ठरू शकते, तसेच कोणत्या गोष्टींचे सेवन करणे आवश्यक आहे ते जाणून घेऊया?

**व्हिटॅमिन एच्या कमतरतेची समस्या:** वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनच्या मते, व्हिटॅमिन एची कमतरता बालपणातील संसर्गामुळे मृत्यूच्या धोक्यात एक प्रमुख घटक म्हणून ओळखली जाते. हे जीवनसत्त्व डोळ्यांच्या आरोग्यासाठी खूप महत्त्वाचे आहे, त्यामुळे ज्या मुलांमध्ये याची कमतरता आहे त्यांना चष्मा लावणे आवश्यक आहे. व्हिटॅमिन एची कमतरता ही माता मृत्यू आणि गर्भधारणेदरम्यान अनेक समस्यांना कारणीभूत असल्याचे मानले जाते. डोळे आणि त्वचा निरोगी ठेवण्यासाठी, सर्व लोकांनी आहारात हे जीवनसत्त्व असलेल्या गोष्टींचा समावेश केला पाहिजे.

**डोळ्याची समस्या:** व्हिटॅमिन एच्या कमतरतेचे सर्वात सामान्य लक्षण म्हणजे डोळ्यांच्या समस्या. यामुळे अंधुक दृष्टी, डोळ्यांमध्ये कोरडेपणा आणि गंभीर प्रकरणांमध्ये कॉर्नियाचे नुकसान ते अगदी अंधत्व यासारख्या समस्या असू शकतात. व्हिटॅमिनची कमतरता हे डोळ्यांच्या आजारासाठी एक प्रमुख घटक म्हणून ओळखले जाते ज्याला रातांधळेपणा म्हणतात. सर्व वयोगटातील लोकांनी आहारातून याचे सेवन करणे आवश्यक आहे.

**त्वचेच्या समस्या:** डोळ्यांच्या समस्यांव्यतिरिक्त, व्हिटॅमिन-एच्या कमतरतेमुळे, त्वचेशी संबंधित समस्यांचा धोकादेखील वाढतो. जेव्हा तुमच्या शरीराला पुरेसे व्हिटॅमिन ए मिळत नाही, तेव्हा ते त्वचेच्या पेशींची दुरुस्ती करू शकत नाही. अशा परिस्थितीत, व्हिटॅमिन एची कमतरता असलेल्या लोकांमध्ये एक्जिमा किंवा त्वचेतील कोरडेपणाची समस्या सामान्य आहे. अशा लक्षणांपासून सावधगिरी बाळगली पाहिजे.

**व्हिटॅमिन एची आवश्यकता आणि आहार:** प्रौढ पुरुषांना रोज ९०० मायक्रोग्रॅम, प्रौढ महिलांना ७०० मायक्रोग्रॅम आवश्यक असतात. तज्ज्ञ ते पूरकआहाराऐवजी आहारातून घेण्याची शिफारस करतात. हिरव्या पालेभाज्या (केळे, पालक, ब्रोकोली), केशरी आणि पिवळ्या भाज्या (गाजर, रताळे, भोपळा), टोमॅटो, पेपरिका, कँटलप, आंबे, दूध, अंड्याचे सेवन व्हिटॅमिन-ए मिळविण्यासाठी फायदेशीर मानले जाते.

# भिजवून-कोरडे-भाजलेले, साल किंवा सालीसह बदाम खाण्याचे प्रकार:हृदय निरोगी, BP कंट्रोल, स्मरणशक्तीत वाढ, वजन नियंत्रित

बदाम हे आरोग्यासाठी फायदेशीर ड्रायफ्रुट आहे. बदाम खाल्ल्याने मेंदू तीक्ष्ण होतो, त्यामुळेच बदाम खाल्ल्याने स्मरणशक्ती वाढते असे म्हटले जाते. बदामामध्ये अनेक जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात जसे की व्हिटॅमिन-ई, झिंक, कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि ओमेगा-3 फॅटी ॲसिड.

बदाम खाण्याचे अनेक पद्धती आहेत. माजी वैद्यकीय प्रभारी, युनानी डॉ. सुबास राय यांच्या कडून जाणून घेऊ या बदाम खाण्याची योग्य पद्धत आणि त्याचे फायदे.

बदाम खाण्याची योग्य पद्धत

हिरवे किंवा कच्चे बदाम खाण्याचे फायदे

हिरवे बदाम देखील सुक्या बदामाएवढेच आकाराचे असते. असे असले तरी ते जास्त फायदेशीर आहेत. याच्या खाण्याने सुक्या बदामापेक्षा जास्त फायदा होतो. हिरव्या बदामामध्ये फ्लेव्होनॉइड्स, अँटीऑक्सिडंट्स आणि जीवनसत्त्वे भरपूर असतात, ते हृदय, पोट आणि स्नायूंशी संबंधित समस्या कमी करतात.

इतकेच नाही तर त्यात खनिजे आणि प्रथिनेही आढळतात. हिरवे बदाम हे कच्च्या बदामाचाच एक प्रकार आहे.

हिरवे बदाम मज्जासंस्थेच्या विकासासाठी खूप उपयुक्त आहेत.




स्मरणशक्ती वाढवणे

रक्त स्वच्छ करणे

प्रतिकारशक्ती वाढवणे

पीएच पातळी संतुलित ठेवा

हाडे मजबूत करणे

हृदयासाठी फायदेशीर

त्वचा-केसांसाठी फायदेशीरटफ

भिजवलेले बदाम खाण्याचे फायदे

बदाम पाण्यात भिजवून खावे असे म्हटले जाते कारण बदामाच्या तपकिरी त्वचेत टॅनिन असते, जे पोषण रोखते.

बदाम 6-8 तासांपेक्षा जास्त पाण्यात भिजवू नयेत. भिजवलेले बदाम पचनास मदत करतात. वजन कमी करण्यासाठी देखील हे फायदेशीर आहे.

यातील मोनो अनसॅच्युरेटेड फॅट भूक नियंत्रित करते. भिजवलेले बदाम हे अँटीऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत आहे. यामध्ये असलेले व्हिटॅमिन बी17 आणि फॉलिक ॲसिड कॅन्सरपासून बचाव करतात, खराब कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रित करतात आणि हृदयरोग दूर ठेवते.

बदामाचे हे गुणधर्म हृदय निरोगी ठेवण्यास मदत करतात आणि हृदय प्रणालीला नुकसान आणि ऑक्सिडेटिव्ह तणावापासून संरक्षण करतात.

कर्करोगापासून संरक्षण करते

रक्तदाब सामान्य ठेवते

मधुमेह नियंत्रण ठेवते

रोगप्रतिकार शक्ती वाढवाते

गर्भवती महिलांसाठी फायदेशीर

न जन्मलेल्या बाळासाठी वरदान


सालसहीत किंवा साल काढलेली बदाम भिजवून सोलून खाण्याची जुनी पद्धत आहे. पण आरोग्यासाठी कोणते चांगले आहे हे जाणून घेणे देखील महत्त्वाचे आहे. बदाम सालीसह खाणे किंवा भिजवून साल सोलून खाणे यापैकी बदाम कसे खावे. तर भिजवलेले बदाम साल काढून खाणे हे जास्त चांगले असते. कारण बदामाच्या सालीमध्ये टॅनिन असतात, जे पोषण रोखतात. तसेच बदाम भिजवल्याने साल सोलणे सोपे होते, भिजवलेले बदाम खाणे देखील श्रेयस्कर आहे कारण भिजवण्याच्या प्रक्रियेमुळे म्हातारपणात पचनाच्या समस्या आणि दातांच्या समस्या वाढतात तेव्हा ते मऊ आणि पचायला सोपे होते.

पचन सुधारते- बदामामध्ये भरपूर अँटीऑक्सिडंट असतात, भिजवलेल्या बदामाचे गुणधर्म अनेक पटींनी वाढतात, जे पचनासाठी चांगले असते.

वजन कमी करते- बदाम भिजवल्याने काही एन्झाईम बाहेर पडतात जे चयापचय वाढवतात आणि वजन कमी करतात.

फायटिक ॲसिड काढून टाकणे गरजेचे- बदामामध्ये असलेले फायटिक ॲसिड काढून टाकले जात नाही, त्यामुळे जर तुम्ही कच्चे बदाम खाल्ले तर त्यामध्ये असलेले झिंक आणि लोह शरीरात योग्यरित्या वापरले जात नाही.

बदाम भिजवून खाण्याची योग्य पद्धत एक कप पाण्यात मूठभर बदाम सहा ते आठ तास भिजत ठेवा. दुसऱ्या दिवशी पाणी काढून साल सोलून ताजे बदाम खावे, हे आरोग्यासाठी चांगले असते.



# विना निमकोटेड युरिया वापरल्याने...

युरिया जमिनीत मिसळल्याने त्याचा पाण्याबरोबर संपर्क होताच तो लगेच विरघळतो. त्यातील नत्र पिकांना उपलब्ध होण्याची क्रिया तत्काळ सुरु होऊन काही प्रमाणात पाण्याबरोबर जमिनीत वाहून जातो. त्यामुळे जमिनीतील पाणी दूषित होते. या प्रक्रियेद्वारा नायट्रस ऑक्साइड नावाचा ग्रीन हाउस वायू तयार होतो. त्यामुळे वातावरणातील हवा दूषित होते.

## युरियाचा अवाजवी वापर टाळण्यासाठी...

खते देण्यापूर्वी माती परीक्षण करावे. माती परीक्षण अहवालानुसार खते द्यावीत. नत्रयुक्त खतांचा सेंद्रिय खतांबरोबर वापर करावा. हिरवळीच्या खतांचा वापर करावा. नत्रयुक्त खते पेरणीच्या वेळी फेकून न देता, दोन चाड्यांच्या पाभरीने पेरून द्यावी. नत्र खताची मात्रा विभागून द्यावी. एक किलो नत्र देण्यासाठी २.१७ किलो युरिया द्यावा. युरियाचा वापर कमी करण्यासाठी तृणधान्य पिकांना ॲझोटोबॅक्टर तर द्विदल पिकांना रायझोबियम या जीवाणू खतांची बीजप्रक्रिया करावी. जैविक खतांच्या वापरामुळे तृणधान्य, द्विदल पिके व भाजीपाला पिकांमध्ये १५-२० टक्के नत्राची बचत होते व उसामध्ये ५० टक्क्यांपर्यंत बचत होते. भातासारख्या पिकास युरिया ग्रॅनुल्सचा वापर करावा.

कोरडवाहू शेतीमध्ये नत्रयुक्त खते पेरणीच्या वेळेस पेरून द्यावीत. ऊस, केळी, बीटी कापूस यासारख्या दीर्घ मुदतीच्या पिकांना युरिया खताची मात्रा विभागून द्यावी. नायट्रेटयुक्त खते वाहून जाऊ नयेत म्हणून नियंत्रित आणि हलकी ओलिताची पाळी द्यावी व चोपणयुक्त जमिनीत युरिया खते हे शेणखत, कंपोस्टखत अथवा गांडूळ खताबरोबरच द्यावे. तसेच युरिया खताची मात्रा २५ टक्क्यांनी वाढवून द्यावी.

राज्यातील ५२ टक्के जमिनीत गंधकाचे प्रमाण कमी आहे. अशा जमिनीत युरियाला पर्यायी अमोनियम सल्फेटचा वापर केल्यावर पिकांना नत्राबरोबर गंधक हे अतिरिक्त अन्नद्रव्य मिळून त्याचे चांगले परिणाम दिसतील.

युरिया फेकून अथवा पेरून देण्यापेक्षा पाण्यात मिसळून फवारणीद्वारे दिला तर अत्यंत कमी खतात आणि कमी खर्चात चांगले परिणाम दिसू शकतील. युरियाला पर्यायी काही नत्रयुक्त विद्राव्य खते सुध्दा बाजारात उपलब्ध आहेत. टंचाईच्या काळात त्याचा वापर केला जाऊ शकतो. अशा खताबाबत प्रबोधन वाढवून त्याचा वापर शक्य होईल.

युरियाचा अवाजवी वापर टाळण्यासाठी सरकारने २०१८-१९ पासून युरियाची गोणी ही ४५ किलोची केली आहे. कमी प्रमाणात युरियाचा वापर व्हावा हा त्यामागे उद्देश आहे. शेतकरी गोणीच्या हिशेबाने खते देतात. केंद्र शासनाने मे २०१५ पासून देशात उत्पादित होणारा युरिया डिसेंबर २०१५ पासून आयातीत युरिया सर्व उत्पादक व पुरवठादार यांना निम कोटींग करूनच पुरवठा व विक्री करणे बंधनकारक केले आहे.

पोलीस बातमी पत्र



मुंबई, मंगळवार ११ ते १७ ऑक्टोबर - २०२२



संपादकीय...

# आधीच यश साजरे करणे धोक्याचे

गेल्या काही दिवसांत भारत पुन्हा एकदा चमकू लागला आहे आणि अशी विजयचिन्हे मिरवणे हे आपले एकप्रकारे धोकादायक राष्ट्रीय वैशिष्ठ्य आहे. अद्ययावत विमानतळांपासून लसीकरणातील आकड्यांपर्यंत आपण कशी जोरदार मजल मारली आहे हे सांगण्याची अहमहिका लागल्याचे चित्र दिसते. पण त्यात अनेक बाबींमध्ये मोठ्या त्रुटीही आहेत. एकुणातच आधीच यश साजरे करणे धोकादायक आहे.

गेल्या काही दिवसांत माध्यमांमधून एकूणच भारतीय यशाबद्दल लिहिले-मांडले जात आहे. त्यामध्ये प्रामुख्याने कधीकाळी आपल्यावर राज्य करणाऱ्या ब्रिटनला विकासदरामध्ये मागे टाकल्याच्या बातमीने सगळ्या जगाचे लक्ष वेधून घेतले होते. भारतीय बाजारपेठ तेजीत आल्याचे हे निदर्शक आहे, असेच चित्र मांडले गेले. भारताचा विकास, बौद्धिक संकल्पना आणि नैतिकतेच्या प्रचंड दुष्काळामध्ये भारत एक मरुद्यान म्हणून दिसत आहे. याशिवाय इतर क्षेत्रांकडे पाहत असताना कधी नव्हे एवढ्या वेगाने आपले सशस्त्र दल आधुनिकीकरण करत आहे. आपल्या एकूणच प्रगतीमुळे शत्रूला धडकी भरू पाहत आहे.

खेळाच्या क्षेत्रात उत्तुग कामगिरी होताना दिसत आहे. जिंकलेल्या पदकांची संख्या वाढत आहे. जगभरात मोठ्या पदांवर भारतीय काम करत आहेत. असा एकदम यशाचा मूड दिसत आहे. त्याला काहीसा ब्रेक लावणे गरजेचे आहे. वरील सर्व कथित व वास्तविक यशांना वास्तविकता आणि तथ्यांच्या कसोटीवर उतरवणे हे जेवढे महत्त्वाचे आहे तेवढेच आपले राष्ट्रीय विचार, पद्धती आणि शैलीनुसार उभ्या राहणाऱ्या काही संकटांपासून सावध करणेही आवश्यक आहे. त्यासाठी मी चार बाबी सांगतो.

'बारात की घोडी'ची मानसिकता

आपण भारतीयांकडे 'बारात की घोडी' ची मानसिकता अधिक दिसते. अशी घोडी ज्यावर वर लग्नासाठी उत्तरेत तसेच मध्य भारतात येतात. सवयीनुसार आणि घोडीला दिलेल्या प्रशिक्षणानुसार ती घोडी दर पन्नास यार्डावर थांबते. पाहुणे आले की पुढे जाते. तसेच काहीसे आपल्या यशाचे आहे. सातत्यपूर्ण, स्व-सुरुवात आणि स्वयं-प्रेरित कार्यावर आमचा विश्वास नाहीच...अगदीच सन्माननीय अपवाद वगळता. हे ऐकायला तुम्हाला कटू वाटत असले तरी व्यवसाय आणि उत्पादकता तपासा. विचार करा...उत्तर मिळून जाईल. आम्हाला असे वाटते की आम्ही दुसऱ्याचे काम अधिक चांगल्या पद्धतीने करू शकतो. भारतीय क्रिकेट संघाचे प्रशिक्षक किंवा निवडकर्त्याचे काम आपण अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो. लष्करातील अनेकांना असे वाटते की ते पोलिसांचे काम चांगले करू शकतील. नागरी सेवकांना विश्वास वाटतो की ते सर्वच कामे चोखपणे करू शकतील. तर आम्हा पत्रकारांना आम्ही मार्केटिंग आणि वितरणमधील काही बाबी उत्तम करू शकतो असे वाटते.

इंडिया शायनिंग अन् इंडिया एव्हरीव्हेअर

विजयाच्या जबड्यातून पराभव हिसकावून घ्यायचा किंवा पराभवाच्या जबड्यातून विजय हिसकावून कसा घ्यायचा हे भारतीयांना माहिती आहे. अशात वर्षानुवर्षे आर्थिक सुधारणांच्या भीतीचा प्रमाणित पुरावाच आहे की पुढे धोके आहेत. जर आपण आपली अर्थव्यवस्था गेल्या दशकांतील काही यशोगाथांप्रमाणे एक दशक चालवू दिली असती, तर कदाचित आपल्या स्वतःच्या तक्रारी करण्याइतपत विसंगती आणि तक्रारी निर्माण झाल्या असत्या आणि चौथा सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे, 'खूप लवकर विजय घोषित करणे हा एक आत्मघातकी प्रलोभन आहे. जे तंतोतंत मूड तयार करत आहे.आम्ही हे आधीही पाहिले आहे. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली दोन-तीन वेळाल राजीव गांधी यांचा 'मेरा भारत महान' व जगभरातील भारताचे उत्सव, अटलबिहारी वाजपेयी यांचे 'इंडिया शायनिंग' २००७ मधील यूपीए अंतर्गत त्या वर्षी दावोसमध्ये झालेले 'इंडिया एव्हरीव्हेअर' सप्ताहाद्वारे स्वयंघोषित विजयाचे शीर्षक सर्वात ठळकपणे अधोरेखित केले गेले. हे सारेच विचार करावयास लावणारे आहे.

• • •

# आपला कोण, भारतीय शेतकरी की चिनी व्यापारी?

महाराष्ट्रातील सत्तापरिवर्तनानंतर अलीकडे उद्वेगजनक म्हणता येतील अशा काही जाहिराती मुंबईत बघायला मिळाल्या. 'आपले सरकार आले आणि हिंदू सणांवरचे विघ्न टळले' असे म्हणणाऱ्या या जाहिराती होत्या. अनेकांना ही ओळ वाचून 'हिंदू सणांवर आजवर कोणते विघ्न आले होते?' हे सत्ताधाऱ्यांना प्रत्यक्ष भेटून विचारावेसे वाटले असेल, तर आश्चर्य नाही. करोनाकाळात सार्वजनिक सणांवर बंदी होती यामागचे विज्ञान लक्षात येण्याइतपत विवेक जागा असावा अशी आशा आहे. गणपती ही बुद्धीचीच देवता असल्याने अशी आशा करायला हरकत नाही. आणि त्याआधी अनेक वर्षे, सरकार कुणाचेही असले तरी सगळे सण आवाजाची मर्यादा न सांभाळता धूमधडाक्यात साजरे होतच होते.

हिंदुत्वाचा, म्हणजेच धर्मभावनेचा जयघोष करताना आपले जे बौद्धिक नुकसान होते आहे तिकडे लक्ष वेधणे गरजेचे आहे. आज धर्म आणि धार्मिकतेची प्रस्तुतता काय, तिचे अधिष्ठान असावे, नसावे हा वेगळ्या चर्चेचा विषय. पण धार्मिक उत्सव, सणवार यांची एक मानसिक-सामाजिक गरज असते हे मान्य करूनही, धार्मिकतेच्या पुढे 'सदसद्विवेका'ची सर्रास बळी देण्याची आपल्याला जी सवय लागली आहे, ती आपल्या वर्तमान आणि भविष्यासाठी घातक आहे हे निक्षून सांगितले पाहिजे. हिंदुत्वाचे राजकारण करणाऱ्यांनी तर 'धार्मिकता' या हळव्या, एका अर्थी बुद्धिगम्य नसणाऱ्या, भावनेचा पुरेपूर वापर करून घेत जनमानसाला इतके अंध करून सोडले आहे की, धर्म हा अभ्यासाचा नसून फक्त अभिमानाचा आणि दुसऱ्या धर्मांकडे शत्रुभावाने पाहण्याचा विषय राहिलेला आहे. महाराष्ट्रात एकेकाळी तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, मे. पुं. रेगे यांच्यासारखे विद्वान अभ्यासक वाईत 'सर्वधर्म अध्ययन केंद्र' चालवत होते. त्या काळी धर्म हा द्वेषयुक्त प्रचाराचा मुद्दा नव्हता, हे आजच्या मराठी जनांना कदाचित माहीतही नसेल. असो.

हिंदूंच्या हिताची राजकीय जपमाळ ओढताना काही हिंदू सोयीस्करपणे दुर्लक्षित राहतात. अशा वेळी बहुधा ते 'हिंदू'मधून 'नागरिका'त रूपांतरित होत असावेत. असेच काही हिंदू/नागरिक म्हणजे फूल उत्पादक शेतकरी. हिंदू सणांच्या निमित्ताने त्यांच्यावर प्रकाशझोत टाकायला हरकत नाही. सण साजरे करणारे हिंदू आहेत तर मग सणासुदीसाठी फुलांचे उत्पादन करणारे भूमिपुत्र अहिंदू आहेत का? भूमिपूत्रांचा रोजगार हिरावणे हे नव्या सरकारचे हिंदुत्व आहे का, हे प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे. कारण, वर उल्लेखलेल्या जाहिरातीतील मजकुराच्या नेमकं विरुद्ध डबल इंजिन (राज्य व केंद्र) सरकारचे वर्तन सुरू आहे. महाराष्ट्रातील भूमिपुत्र शेतकरी आधी अतिवृष्टी व आता परतीच्या पावसाने हैराण झाले आहेत. जोडधंदा असलेल्या पशुधनावर लम्पी रोगाचं संकट आलं आहे. रास्त आणि किफायतशीर भावाची, एफआरपीची (Fair and remunerative price) रक्कम अनेक साखर कारखान्यांनी थकवलेली आहे. अशा परिस्थितीत, फुलांचं उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना फूलशेती हा एक आधार आहे. मात्र डबल इंजिन सरकारच्या कारभारामुळे फूल उत्पादक हिंदू शेतकऱ्यांवरच विघ्न आले आहे. कारण, सरकार चालवणारे धर्माच्या व सण साजरे करण्याच्या नावाखाली जनतेत संभ्रम निर्माण करत आहेत. सण साजरे करणे म्हणजे, आवाजाची मर्यादा ओलांडून नाच-गाणी बजावणं म्हणजे हिंदुत्व असा समज करून देत आहेत.

दरवर्षी गणेशोत्सव, नवरात्र ते दिवाळी या सणांच्या दरम्यान झेंडू व इतर फुलांची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना हाती चार पैसे पडतात. करोनामुळे दोन मोसम वाया गेले. करोनाच्या पहिल्या लाटेत तर फुलांची तोडणी करून ती बाजारात घेऊन जाणंही परवडणारं नसल्याने शेतकऱ्यांनी फुलांच्या पिकावर नांगर फिरविला. लागवडीचा खर्चही अंगावर पडला. फवारणी, खतं, औषधं यांचा मोठा खर्च होतो. सर्वसाधारणपणे हेक्टरी १.२५ लाखापर्यंत खर्च होतो. शेतमालाचा पडेल बाजारभाव, करोना, निसर्ग चक्रीवादळाचे संकट, अतिवृष्टी या संकटांचा सामना करणाऱ्या फूलशेतकऱ्यांपुढे यंदा नवंच संकट उभं ठाकलं. शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासून प्लास्टिक फुलांचा वापर प्रचंड प्रमाणात सुरू झाला आहे.

पर्यावरणाला घातक प्लास्टिकच्या कटफ्लॉवर्सपासून सुरुवात होऊन आता हे प्रकरण मोगरा, शेवंती, झेंडू, आंबा, आणि दारोदारी लावण्याच्या तोरणापर्यंत पोहोचलं आहे. मागील दोन वर्षांचा करोनाकाळ हे वैश्विक संकट होतं. ते संकट संपल्यावर सर्व मंदिरं खुली झाली. विविध सण उत्साहात साजरे होऊ लागले. त्यामुळे मोठ्या आशेने, फूलउत्पादक शेतकऱ्यांनी फुलांचं क्षेत्र वाढवलं. मात्र जागोजागी चिनी प्लास्टिक फुलांची विक्री वाढली आहे. हिंदू मंदिरातील सजावटीसाठीही कृत्रिम फुलांचा वापर होत आहे. नैसर्गिक फुलं नाशवंत असल्यामुळे त्यांची विक्री रोजच्या रोज झाली नाही, तर ती फेकून द्यावी लागतात.

शेतकऱ्यांनी फेकून दिलेली फुलं विघटनशील असल्याने पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मदत करतात. त्यामुळे पर्यावरण सुरक्षित राहण्यास मदत होते. पण पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या प्लास्टिकला झुकते माप देण्याचं सरकारी धोरण भूमिपुत्रांच्या मुळावर उठलं आहे. एका बाजूला हिंदूंचे सण नैसर्गिक-पर्यावरणपूरक पद्धतीने साजरे करा, असं म्हणत गणेशोत्सवात 'प्लास्टर ऑफ पॅरिस'ऐवजी शाडू मातीच्या, गोमय गणेशमूर्तींचा वापर वाढवण्यावर भर द्यायचा आणि दुसऱ्या बाजूला चिनी प्लास्टिक फुले, तोरणमाळा यांच्या विक्री व वापराला खुली सूट द्यायची. हा दुटप्पीपणा कशासाठी? प्लास्टिक पर्यावरणास किती घातक आहे, याची सर्वांनाच जाण आहे. सरकारमधल्यांनाही असायला हवी.

प्लास्टिकबंदीच्या घोषणा राज्यात अनेक वेळा झाल्या, याबाबतचे निर्णयही झाले. परंतु हे सगळे निर्णय कागदावरच ठेवून, नव्या डबल इंजिन सरकारने चिनी बनावटीच्या प्लास्टिक फुलांची विक्री सुरू ठेवत 'आत्मनिर्भर भारत'च्या गप्पा मारणं, हे हिंदूहिताचं कसं? भारतीय पर्यावरणास घातक असलेली परदेशातील वस्तू वापरणं हे शिंदे-फडणवीस यांच्या हिंदुत्वात कसं काय बसतं? आपल्या देशात शेतीमालाचे भाव वाढत असताना तात्काळ निर्यातबंदी लादली जाते. आता चिनी प्लास्टिक फुलं तसंच इतर सजावटीच्या साहित्याने देशातील शेतकरी मातीत जात असताना त्यावर आयातबंदी लादण्याचं धाडस केंद्र सरकार का दाखवत नाही? प्लास्टिकच्या फुलांची देशांतर्गत निर्मिती आणि विक्री थांबायला हवी. त्याचप्रमाणे चीनकडून आयातही थांबवली गेली पाहिजे.

चीनसोबत डोळे लाल करून बोलणी केली पाहिजेत, असं म्हणणाऱ्या पंतप्रधानांनीही राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारप्रमाणेच हिंदूंच्या तोट्याचं धोरण राबवले आहे. अकाली दलाचे खासदार नरेश गुजराल यांनी २०१८ मध्ये सादर केलेल्या अहवालानुसार, २००७-०८ या आर्थिक वर्षात चीन आणि भारताचा व्यापार ३८ अरब डॉलरचा होता. २०१७-१८ मध्ये हा व्यापार वाढून ८९.६ अरब डॉलरचा झाला. भारताच्या चीनकडून आयातीमुळे चीनला ५० अरब डॉलरची वृध्दी झाली. तर याच दरम्यान भारताला चीनकडून निर्यातीत केवळ २.५ अरब डॉलरचे परकीय चलन मिळाले. याच अहवालात असंही म्हटलंय की, 'नॅशनल सोलर मिशन' उपक्रमाचं ८४% साहित्य चीनमधून आलं आहे. २०१८-१९ मध्ये ८५.५ अब्ज डॉलर्सचा व्यवहार झाला होता. तर २०२० मध्ये दोन्ही देशांमध्ये ७७.७ अब्ज डॉलर्सचा व्यवहार झाला. ही माहिती भारताच्या व्यापार मंत्रालयाने दिली आहे. २०२० मध्ये चीनबरोबरच्या द्विपक्षीय व्यापारातील अंतर तब्बल ४० अब्ज डॉलर्सचं आहे. एक प्रकारे हे भारताचं आणि हिंदूंचं नुकसानच आहे.

भारताने अमेरिका आणि संयुक्त अरब अमिरातीकडून, मिळून जेवढी खरेदी केली, त्यापेक्षाही जास्त ५८.७ अब्ज डॉलर्सच्या सामानाची आयात चीनकडून केली. अमेरिका आणि यूएई हे भारताचे अनुक्रमे दुसरे आणि तिसरे सर्वात मोठे व्यापारी भागीदार आहेत. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांवर ओल्या दुष्काळाचं संकट असताना भूमिपुत्रांना संकटातून बाहेर काढण्याऐवजी शत्रुराष्ट्र म्हणून गणल्या जाणाऱ्या चीनसोबत व्यापार वाढवून हिंदू भूमिपुत्रांना उपाशी ठेवणारं 'ऐक'नाथी सरकार हिंदुत्ववादी कसं?

हिंदू सणांसाठी, हिंदू मंदिरांसाठी, दैवतासांठी फुलांचं उत्पादन करणारे भूमिपुत्र पाकिस्तानातून आले आहेत का? शेतीमध्ये नावीन्यपूर्ण काही करू पाहणाऱ्या युवा शेतकऱ्याच्या पदरी निराशा आणि आर्थिक नुकसान आलं आहे. स्वस्तात मस्त प्लास्टिक फुलांमुळे नैसर्गिक फुलांची बाजारातील मागणी धोक्यात आली आहे. उठाव नसल्यामुळे शेतातील फुलं जागेवर सडून जातायत. काही प्रमाणात फुलं विकली गेली, तरी म्हणावा तसा भाव मिळत नसल्याने शेतकरी मेटाकुटीला आले आहेत. भूमिपुत्रांचा रोजगार हिरावणं, फूलशेतीचं क्षेत्र कमी करणं, पर्यावरणाचा ऱ्हास करणं, हे यांचं हिंदुत्व आहे का? मग राज्यात चिनी प्लास्टिक फुलांची सर्रास विक्री व वापर का सुरू आहे? माजी खासदार राजू शेट्टी यांनीही याबाबत केंद्रीय पर्यावरणमंत्र्यांना निवेदन दिलं आहे.



महिला आशिया चषक स्पर्धेत भारत-बांगलादेश आज लढत

# प्रबळ दावेदार आमने-सामने

भारताचा विजयी रथ शुक्रवारी पाकिस्तानने अनपेक्षित रोखल्यानंतर उद्या शनिवारी भारतासमोर यजमान बांगलादेशचे आव्हान आहे. हे दोन्ही संघ तगडे असून महिला आशिया चषक स्पर्धेच्या विजेतेपदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत.

भारताने आशिया चषक २०२२ स्पर्धेतील सुरुवातीचे तिन्ही सामने जिंकून विजयाची हॅटट्रिक साजरी केली. मात्र शुक्रवारी भारताला पाकिस्तानकडून धक्कादायक पराभवाचा सामना करावा लागला. दरम्यान भारत आणि यजमान बांगलादेश या दोन बलाढ्य संघांमध्ये शनिवारी लढत होणार आहे. हे दोन्ही संघ आशिया चषक स्पर्धेच्या विजेतेपदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. जगभरातील क्रीडा चाहत्यांचे या सामन्याकडे लक्ष लागले आहे. भारताच्या दीप्ती शर्मा, पूजा वस्त्राकार यांना पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात प्रभावी गोलंदाजी करता आली. दीप्तीची कामगिरी विशेष राहिली आहे. त्यामुळे दीप्तीकडून कर्णधार कोणत्या स्पेलमध्ये गोलंदाजी करून घेणार हे ही पाहणे महत्त्वाचे आहे. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारताचे जवळपास सर्वच फलंदाज धावा जमवण्यात अपयशी ठरले. एकाही फलंदाजाला मोठी धावसंख्या उभारण्यात यश आले नाही. त्याचा फटका भारताला बसला. त्यामुळे बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात भारतीय फलंदाजांना अधिक सजग रहावे लागणार आहे.






प्रतिस्पर्धी संघ हा यजमान संघ आहे. त्यामुळे स्टेडियममध्ये त्यांचेच प्रेक्षक अधिक असणार यात शंका नाही. गत आशिया चषक स्पर्धेत याच बांगलादेशने अंतिम सामन्यात भारताला पराभूत करत विजेतेपदापासून दूर ठेवले होते. त्यामुळे पाकिस्तानविरुद्धच्या जिव्हारी लागलेला पराभवाची सल आणि गत आशिया चषक स्पर्धेतील अपयशाचे उट्टे काढण्याची संधी अशा दोन्ही कारणांनी शनिवारच्या सामन्याला भारताच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व आहे.

बांगलादेशने यंदाच्या आशिया चषक स्पर्धेतील ३ पैकी २ सामन्यांत मोठ्या विजयाची नोंद केली आहे. गोलंदाजी आणि फलंदाजी अशा दोन्ही आघाड्यांवर त्यांच्या खेळाडूंना चांगल यश आले आहे. त्यामुळे ही लढत दोन्ही संघांकरिता महत्त्वाची आहे.

# डायव्हिंगमध्ये मेधालीचे स्वप्नवत सुवर्णपदक

महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मेधाली रेडकर हिने डायव्हिंगमध्ये राष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक जिंकण्याचे स्वप्न साकार केले. तिची सहकारी ऋतिका श्रीराम हिने कांस्यपदक पटकावित येथे तिसऱ्या पदकाची नोंद केली.

एक मीटर स्प्रिंग बोर्ड प्रकारात मेधाली हिने लवचिकता व आकर्षक रचना याचा सुरेख समन्वय दाखवत सुवर्णपदक जिंकले. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेप्रमाणेच राष्ट्रीय स्तरावरील तिचे हे पहिलेच सुवर्णपदक आहे. ती मुंबई येथे तुषार गीते यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. व्यवसायाने फिजिओ असलेल्या या खेळाडूने आजपर्यंत राज्य व राष्ट्रीय स्तरावर भरपूर पदके जिंकली आहेत.

मेधाली रेडकरने सांगितले की, "आजपर्यंत राष्ट्रीय स्तरावर मला सुवर्णपदकाने हुलकावणी दिली होती. त्यामुळे येथे सर्वोत्तम कामगिरी करण्याचे ध्येय होते आणि मी सर्वोच्च कौशल्य दाखविले. राष्ट्रीय स्तरावर पहिले सुवर्णपदक मिळविल्यामुळे मला खूप आनंद झाला आहे. हे सुवर्णपदक माझ्या भावी करिअरसाठी प्रेरणादायकच आहे."



राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा

## ऋतिकाची पदकांची हॅटट्रिक

ऋतिका श्रीराम हिने येथे पदकांची हॅटट्रिक पूर्ण केली. तिने याआधी या स्पर्धेत तीन मीटर्स स्प्रिंग बोर्ड व हाय बोर्ड प्रकारात सोनेरी कामगिरी केली होती. तिचे पती आणि आंतरराष्ट्रीय डायव्हिंगपटू हरी प्रसाद यांच्या मार्गदर्शनाखाली ती सराव करीत आहे.

# पाकिस्तानचा भारताविरुद्ध धक्कादायक विजय



पाकिस्तानच्या महिला संघाने उत्तम कामगिरी करत विजयाचा प्रमुख दावेदार मानल्या गेलेल्या भारतीय महिला संघाचा १३ धावांनी धक्कादायक पराभव केला. आशिया चषक स्पर्धेत भारताविरुद्ध पाकिस्तानचा हा पहिलावहिला टी-२० विजय आहे. तसेच तब्बल ६ वर्षांनी पाकिस्तानने भारतीय महिला संघावर विजय मिळवला आहे. एक दिवस आधी थायलंडसारख्या दुबळ्या संघाकडून पराभव पत्करावा लागलेल्या पाकिस्तानच्या महिलांनी टीम इंडियाला पराभूत केले. त्यामुळे सलग तीन सामने जिंकणाऱ्या भारताची विजयी घोडदौड पाकिस्तानने रोखली आहे. विशेष म्हणजे भारताच्या ऋचा घोषने आठव्या क्रमांकावर येऊन ताबडतोड फलंदाजी केली. पण तिची खेळी व्यर्थ गेली. महिला टी-२० सामन्यात आठव्या क्रमांकावर येत सर्वाधिक (३) षटकार ठोकण्याचा विक्रम ऋचाने केला आहे.

आशिया चषक २०२२ मधील शुक्रवारच्या सामन्यात, हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील ब्लू संघाला गोलंदाजी आणि नंतर फलंदाजी अशा दोन्ही आघाड्यांवर प्रभावी कामगिरी करता आली नाही. जेमिमाह, स्मृतीसारख्या महत्त्वाच्या बॅटर्सनी यावेळी अपेक्षाभंग केला. ऋचा घोष वगळता एकाही फलंदाजाला प्रभावी कामगिरी करता आली नाही. घोषने १३ चेंडूंत एक चौकार आणि तीन षटकारांसह २६ धावा ठोकल्या. पण ऋचा बाद झाल्यानंतर चमत्काराच्या आशा मावळल्या आणि भारत विजयापासून १३ धावा दूर राहिला. भारतातर्फे फिरकीपटू दीप्ती शर्मा (३/२७), पूजा वस्त्राकार यांनी पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात अपेक्षित अशी प्रभावी गोलंदाजी केली.

थायलंडकडून लाजिरवाणा पराभव पत्कारावा लागलेल्या पाकिस्तान संघाने या सामन्यात अप्रतिम कामगिरी केली. विशेषतः निदा दारने ३७ चेंडूंत ५ चौकार व १ षटकार खेचून नाबाद ५६ धावांची खेळी केली, शिवाय गोलंदाजीतही २४ धावा देत जेमिमाह व हरमनप्रीत हे दोन महत्त्वाचे बळी घेतले. तिला नशरा संधू (३/३०), सादिया इक्बाल (२/२४), आयमान अन्वर (१/१४) व तुबा हसन (१/३२) यांनी चांगली साथ दिली. सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पाकिस्तानने ६ बाद १३७ धावा केल्या. प्रत्युत्तरार्थ भारतीय महिला संघ सर्व विकेट्स गमावून केवळ १२४ धावांपर्यंतच मजल मारू शकला.

# अपघातास परिवहन विभागाचा भ्रष्टाचार जबाबदार परिवहन विभागाच्या हलगर्जीपणामुळे अपघात



ठाणे : महाराष्ट्रात रस्त्यांवर होणारे अपघात हे मानवी चुकीमुळे होत आहेतच मात्र परिवहनच्या नियमांचे उल्लंघन झाल्याने सर्वात जास्त अपघाताचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. हे प्रकार रोखण्यासाठी आवश्यक असलेले परिवहन विभागाचे प्रयत्न देखील भ्रष्टाचारामुळे होताना दिसत नाहीत. यामुळे सर्वसामान्य नागरिकांचा जीव रस्त्यातील अपघातामध्ये जात आहे. परिवहन विभागाच्या हलगर्जीपणामुळे अपघात - दोन दिवसांपूर्वी नाशिक येथे झालेल्या बस अपघातात 12 जणांचा बळी गेला होता. ही बस आपल्या प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी घेऊन जात होती. या बसला अपघात होण्यास कारणीभूत ठरलेला ट्रक हा गुजरात राज्यातील होता. या ट्रकचे सर्व कागदपत्र हे देखील सुरुवातीच्या तपासात अर्धवट असल्याचे जाणकार सांगत असून परिवहन विभागाने योग्य वेळी जर कारवाई केली असती तर, कारवाई झाल्यामुळे अधिक प्रवासी बस मधून गेले नसते. या अपघातात बळींची संख्या ही कमी झाली असती. मात्र प्रत्येक महिन्याला सुरू असलेल्या परिवहन विभागाचा हप्ता हा अशा प्रकारच्या अपघातात नागरिकांच्या मृत्यूस कारणीभूत ठरत आहे ट्रान्सपोर्ट वाहनांबद्दल होणारा हलगर्जीपणा - मालवाहतूक करणाऱ्या वाहनांचा फिटनेस हा सर्वात गंभीर विषय आहे कारण सर्वाधिक रस्त्याचा वापर हा मालवाहतूक करणारे वाहन करतात या वाहनांमध्ये ओव्हरलोड वाहन सुरक्षिततेच्या उपायोजना न केलेली वाहन आणि अवैधरित्या वाहतूक करणारी वाहनही परिवहन विभागाचा आशीर्वाद मिळाल्यानंतरच रस्त्यावर धावतात. आणि अपघातास कारणीभूत ठरवून लोकांचे बळी घेतात. मृत्यु झाल्यानंतर ही मिळतात वाहन परवाने - परिवहन विभागाच्या गलथान कारभारामुळे मृत्यूनंतर ही दाखले मिळू शकतात हे ठाणे व आरटीओ मध्ये जिवंत उदाहरण पाहायला मिळत आहे. अशा प्रकारे अनेक मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांना आरटीओकडून परवाने दिल्याची तक्रार पोलिसांच्या चौकशीच्या आधीन आहे. बोगस कागदपत्रांच्या आधारे निघत लायसन्स - ठाणे आरटीओ मध्ये परवाना देण्यासाठी आवश्यक असलेली कागदपत्र बोगस वापरून परवाने दिल्या बाबत अनेक गुन्हे दाखल झाले असून या प्रकाराची देखील चौकशी ठाणे पोलीस करत आहेत हे परवाने देत असताना ज्या अधिकाऱ्यांची जबाबदारी या परवानांसाठी आवश्यक असलेले कागदपत्र तपासणे हि असते ही जबाबदारी देखील योग्य रीतीने पार पाडली गेली नाही असे चौकशीत समोर आले आहे. राज्याबाहेरील वाहनांचा फिटनेस 38 चा घोटाळा - राज्यात आणि राज्याबाहेर असलेल्या ट्रान्सपोर्ट वाहनांचे पासिंग करण्यासाठी आवश्यक असतो 38 आणि 38a हा नियम देखील योग्य रीतीने पाळला जात नाही, फिटनेस तपासण्यासाठी वाहन प्रत्यक्षात हजर असणे आवश्यक असते ते देखील भ्रष्टाचारामुळे पार पाडले जात नाही आणि वाहनांच पासिंग केली जाते. ऑनलाईन असूनही घोटाळा सुरूच

- परिवहन विभागाचा सर्व व्यवहार हा ऑनलाईन आहे,मात्र तरी देखील अधिकारी एजंट यांच्या संगनमतामुळे हा भ्रष्टाचार सुरू आहे. अवश्यक असलेला अंकुश देखील परिवहन विभागावर नसल्यामुळे हे अपघात होत असल्याचे जाणकार सांगत आहेत. अपघात अर्ध्यावर येतील - जर परिवहन विभागाचे नियम काटेकोरपणे पार पाडले,तर अपघात अर्ध्यावर येतील असा विश्वास जाणकार सांगत आहेत. नियमाची पायमल्ली आणि नियमांकडे दुर्लक्षासाठी भ्रष्टाचार सुरू आहेत, कारण सर्व वाहनांचे पासिंग करताना त्यांची चाचणी ही व्हिडीओ रेकॉर्डिंग करून करावी असा नियम असताना या नियमाचे पालन प्रत्यक्षात होत नाही याबाबत न्यायालयाने आदेश दिले आहेत त्याचे देखील पालन परिवहन विभाग करत नाही.

# ठाण्यात पुनर्विकासाचा प्रश्न गंभीर



ठाणे शहराची स्मार्ट सिटीकडे त्याचप्रमाणे भौगोलिकदृष्ट्या वाढ होत असताना शहर भागातील जुन्या चाळी, इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रश्न गंभीर झाला आहे. दरवर्षी पावसाळा आला की ठाणे शहरातील जुन्या, धोकादायक चाळी, इमारतींतील रहिवाशांसमोरील चिंतेचे ढग उभे राहतात. ठाण्यातील नागरिकांना सुरक्षित आणि हक्काचा निवारा मिळावा यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून क्लस्टर योजनेचे गाजर दाखवले जात आहे. मात्र प्रत्यक्षात ही योजना मार्गी लागण्यासाठी आणखी किती वर्षं लागतील यांचा अंदाज महापालिका प्रशासनालाही नाही. असे असताना दुसरीकडे शहरातील धोकादायक आणि जुन्या तसेच जीर्ण झालेल्या इमारतींची संख्याही प्रत्येक वर्षी वाढत असून अशा काही इमारतींच्या पुनर्विकासाची मंजुरीही क्लस्टर योजनेमुळेच रखडली आहे. एखाद्या धोकादायक किंवा जुन्या इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडे आल्यास प्रशासनाकडून आधी क्लस्टर सेलचा अभिप्राय मागवला जात आहे. संबंधित इमारतीचा समावेश क्लस्टर योजनेत असल्यास याच योजनेतून पुनर्विकास केला जाईल, असा अभिप्राय येत असल्याने क्लस्टर योजना मार्गी लागेपर्यंत नागरिकांना धोकादायक निवाऱ्यातच राहावे लागणार आहे, एवढे मात्र निश्चित झाले आहे. ठाणे शहरात धोकादायक, जुन्या आणि जीर्ण झालेल्या इमारतींचा प्रश्न गेल्या अनेक वर्षांपासुन जटिल आहे. अजूनही मोठ्या प्रमाणात नागरिकांचे वास्तव्य हे जुन्या इमारतींमध्ये आहे. धोकादायक आणि अनधिकृत इमारतींमध्ये जीव मुठीत घेऊन राहण्यापेक्षा या सर्व नागरिकांना अधिकृत आणि त्यांच्या हक्काचा निवारा मिळावा यासाठी क्लस्टर योजनेचा पर्याय समोर आणला. ठाण्यातील सत्ताधारीही याच योजनेचे गाजर दाखवून महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीला सामोरे जात आहेत. क्लस्टर योजनेच्या माध्यमातून शहरात ४४ यूआरपी बनवण्यात आले असून या माध्यमातून शहरातील इमारतींचा सामूहिक पुनर्विकास केले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात किसननगर, लोकमान्य नगर, राबोडी, टेकडी बंगला, अशा यूआरपींचा समावेश करण्यात आला असून प्रत्यक्षात कामाला कधी सुरुवात होईल याचे उत्तर मात्र प्रशासनाकडेही नाही. क्लस्टर योजनेला किती वर्षं लागतील? ही योजना मार्गी लागेल की नाही, भविष्यात यामध्ये काही तांत्रिक अडचणी आल्या तर या योजनेचे काय होणार असे अनेक प्रश्न समोर असताना दुसरीकडे आता याच योजनेमुळे विशेषकरून जुन्या ठाण्यातील तसेच कळव्यातील अनेक जुन्या आणि जीर्ण झालेल्या इमारतींचा पुनर्विकाच्या मंजुऱ्या रखडल्या आहेत. ठाणे महापालिकेकडे एखाद्या इमारतींच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव सादर केल्यास आधी क्लस्टर सेलचा अभिप्राय मागवला जात आहे. दुसरीकडे सदरची योजना एखाद्या यूआरपीमध्ये येत असल्यास क्लस्टर योननेतूनच पुनर्विकास करण्याचा पर्याय ठेवला जात आहे

# मूसेवालाच्या हत्येप्रकरणी फरार गुंडांच्या गर्लफ्रेंडला मुंबई विमानतळावरून अटक



मुंबई : पंजाबी गायक सिद्धू मूसेवालाच्या हत्येप्रकरणी फरार गुंड दीपक टिनूच्या प्रेयसीला मुंबई विमानतळावरून पंजाब पोलिसांनी अटक केली आहे. जितंदर कौर उर्फ ज्योती देओल, असे अटक केलेल्या महिलेचे नाव असून ती मुंबईहून मालदीवला पळून जाण्याच्या प्रयत्नात होती. गँगस्टर लॉरेन्स बिश्नोईचा साथीदार दीपक टीनू १ ऑक्टोबरच्या रात्री पोलिसांच्या ताब्यातून फरार झाला होता.

या संदर्भात डीजीपी गौरव यादव यांनी ट्विट केले की, पंजाब पोलिस आणि एजीटीएफने गुप्त माहितीच्या आधारे मुंबई विमानतळावरून पोलिसांच्या ताब्यातून पळून गेलेल्या गँगस्टर दीपक टिनूच्या महिला साथीदाराला अटक केली आहे. टिनूला अटक करण्यासाठी तपास सुरू आहे. अटकेनंतर आरोपी जसप्रीत कौर उर्फ ज्योतीला पोलिसांनी मानसा न्यायालयात हजर केले. न्यायालयाने तिला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. १४ ऑक्टोबरला तिला पुन्हा हजर केले जाणार आहे. गुंड मिळालेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेली महिला आरोपी लुधियाना जिल्ह्यातील खंडूर गावची रहिवासी आहे.

रविवारी सायंकाळी तीच्या खंडूर गावातल्या घरावरही मानसा पोलिसांनी छापा टाकला.

गुंड दीपक टिनूला पळून नेण्यात आरोपी ज्योतीची महत्त्वाची भूमिका होती. सुमारे एक आठवड्यापूर्वी गुंड दीपक टिनू मानसा पोलिसांच्या ताब्यातून फरार झाला होता, जो अद्याप सापडलेला नाही.

# मुंबईत डोळ्याची साथ; प्रशासनाकडून काळजी घेण्याचे आवाहन



मुंबई : वातावरणातील वाढत्या बदलामुळे मुंबईत डोळे येण्याची साथ सुरू झाली आहे. डोळयांतून पाणी येणे, लाल होणे, डोळे चुरचुरणे, डोळयात खुपणे अशा प्रकारच्या तक्रारीही मुंबईकरांमध्ये वाढल्या आहेत. परिणामी, खासगी आणि सार्वजनिक रुग्णालयांमध्ये डोळे आल्याच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या रुग्णांचे प्रमाण वाढत आहे. संसर्ग टाळण्यासाठी काळजी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून केलं जात आहे.

हवामानातील उष्मा वाढत असला, तरीही काही ठिकाणी मध्येच पावसाची सर येते, हे वातावरण डोळे येण्याच्या संसर्गासाठी पोषक असते. हा साथीचा आजार योग्य प्रकारे काळजी घेतली नाही, तर अधिक फैलावतो आधीच वातावरणातील बदलांमुळे हैराण असलेले मुंबईकर, आता डोळे येण्याच्या साथीने त्रस्त आहेत.

हा आकडा दिवसेंदिवस वाढत असल्याने रुग्णांनी बाहेर जाणे टाळावे, असा सल्ला डॉक्टरांकडून मुंबईकरांना देण्यात येत आहे. तसेच, या साथीचे प्रमाण वाढत असल्याने रुग्णांनी घरी बसून आराम करावा, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे. गेल्या आठवड्यापासून मुंबईत डोळयांची साथ पसरू लागली आहे. या प्रकारात डोळयांना सूज येते, अशीच काहीशी लक्षणे मुंबईकरांमध्ये दिसून येत आहेत. डोळयांवर घरगुती उपाय करू नका. डॉक्टरांच्या सल्ल्याने उपचार घ्या, असे आवाहन रुग्णांना तज्ज्ञांकडून केले जात आहे.

# ठाणे– पनवेल लोकल ट्रेनमध्ये मारहाण करणाया महिलेला अखेर अटक



नवी मुंबई: बुधवारी संध्याकाळी पावणे आठच्या दरम्यान ठाणे ते पनवेल या दिशेने जाणाऱ्या लोकलमध्ये महिलांमध्ये तुंबळ हाणामारी झाल्याची घटना घडली होती. या घटनेत महिला पोलीस देखील जखमी झाले होते. याप्रकरणी वाशी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा देखील नोंद झाला होता, ही घटना सोशल मीडियावर देखील प्रचंड व्हायरल झाली होती. अखेर मारहाण करणाऱ्या महिलेलेला अटक करण्यात आली आहे. लोकल ट्रेनमध्ये बसण्यावरून झाले होते भांडण बुधवारी संध्याकाळी पावणे आठच्या दरम्यान ठाणे ते पनवेल या दिशेने जाणाऱ्या लोकलमध्ये ठाण्यावरून मायलेकी आणि नात या पनवेलचे दिशेने जात होते. यावेळी कोपरखैरणे इथे एक महिला चढली. जागेवर बसण्यावरून 3 महिलांमध्ये तुंबळ हाणामारी झाली होती.सीटवर बसण्यावरून झालं भांडण बुधवारी 5 तारखेला ठाणे पनवेल लोकल ट्रेनमध्ये तुर्भे रेल्वे स्टेशन ते सिवूड रेल्वे स्टेशन दरम्यान मिडल महिला डब्यात 2 महिला प्रवाशी याच्यामध्ये सीटवर बसण्याच्या वादातून भांडण झाले होते. लोकल ट्रेनच्या डब्यातील इतर महिला प्रवाशी भांडण करणाऱ्या महिलांना भांडण करू नका, असे सांगत होते. परंतु ठाणे येथून बसलेल्या गुळनाथ जुबेर खान (50) आरजू तोहीत खान (30) या तळोजा येथे राहणाऱ्या मायलेकींनी कोपैखरणे रेल्वे स्टेशन येथून चढलेल्या महिला प्रवाशी स्नेहा ओंकार दिवडे (20) हिला मारहाण करू लागले. महिला पोलिसांनी देखील केली मारहाण लोकल ट्रेनमध्ये एका महिलेला दोघी मायलेकी मारहाण करत असल्याचे डब्यातील इतर महिला प्रवाशी यांनी नेरुळ रेल्वे स्टेशन आल्यावर फलाट गस्तीवार असलेल्या पोलिसांना सांगितले.

# गुजरातमध्ये ड्रग्ज तयार करायचा अन् मुंबईत विकायचा, 7000 कोटींचं ड्रग्ज बनवणाऱ्या मास्टरमाईंडला पोलिसांनी ठोकल्या बेड्या




मुंबई पोलिसांनी मोठी कारवाई करत तब्बल सात हजार कोटी रूपयांचे ड्रग्ज बनवणाऱ्याला बेड्या ठोकल्या आहेत. प्रेम प्रकाश सिंह असे पोलिसांनी अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. पोलिसांना त्याच्या बँक खात्यात दोन कोटी रूपयांची रक्कम मिळून आली असून तब्बल शंभर कोटी रूपयांचे व्यवहार त्याच्या खात्यावरून झाल्याचे तपासात पुढे आले आहे. गेल्या तीन वर्षांपासून प्रेम प्रकाश सिंह हे ड्रग्ज बनवत असल्याची देखील पोलिसांना माहिती मिळाली आहे. पोलिसांनी त्याचे हे बँक खाते गोठवले असून त्याची कसून चौकशी करण्यात येत आहे. प्रेम प्रकाश सिंह याच्याकडे कसून चौकसी केल्यानंतर पोलिसांना धक्कादायक माहिती मिळाली आहे. प्रेम प्रकाश सिंह याने उत्तरांचल विद्यापीठातून रसायनशास्त्राचे शिक्षण घेतले आहे. सिंह याने यापूर्वी एका केमिकल कंपनीत सल्लागार म्हणून काम केले असून त्यानंतर त्याने स्वतःची श्रेया केमिकल्स नावाची कंपनी सुरू केली. या कंपनीच्या वेबसाइटवर त्याने सुमारे 110 केमिकलची माहिती टाकली. या 110 केमिकलशी संबंधीत आमची कंपनी काम करते असा वेबसाईटवर उल्लेख केला, अशी माहिती मुंबई पोलिसांच्या अँटी नार्कोटिक सेलचे डीसीपी दत्ता नलावडे यांनी दिली. डीसीपी नलावडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या तीन वर्षांपासून प्रेम प्रकाश सिंह हे ड्रग्ड बनवत होता. त्यातून त्याने कोट्यवधी रूपयांच्या ड्रग्जची विक्री देखील केली आहे. पोलिसांना याबाबत माहिती मिळाल्यानंतर त्याचे एक बँक खाते गोठवले आहे, ज्यामध्ये सुमारे दोन कोटी रुपयांची रक्कम मिळाली आहे. याशिवाय त्याच्या खात्यातून तब्बल 100 कोटींहून अधिक रक्कमेचे व्यवहार करण्यात आले आहेत. ड्रग्ज विक्री करून मिलालेल्या पैशांतून त्याने कोट्यवधी रूपयांची मालमत्ता खरेदी केली आहे. ड्रग्ज विक्रीच्या पैसातून त्याने गुजरातमधील भरुचमध्ये 7000 चौरस मीटरचा भूखंड खलेदी केला असून तेथे तो स्वतःची केमिकल कंपनी सुरू करण्याच्या तयारीत होता. परंतु, त्यापूर्वीच त्याचा पोलिसांनी भांडाफोड केलाय. एका फोनवरून झाला कोट्यधीश प्रेम प्रकाश सिंह हा ड्रग्ज तयार करत असताना त्याचा एका अज्ञात व्यक्तीचा फोन आला. फोन केलेल्या व्यक्तीने सिंह याच्याकडे प्रोपियोनिक ऍसिड नावाच्या केमिकलची मागणी केली. त्यासाठी तो मोठी रक्कम द्यायला देखील तयार होता. त्यानंतर सिंह याने स्वतः एमडी ड्रग्ज बनवले आणि त्यातून मोठा नफा कमावला. त्यानंतर त्याने स्वत:ची श्रेया केमिकल नावाने कंपनी सुरू केली. या कंपनीमध्येच तो मोठ्या प्रमाणावर ड्रग्ज तयार करू लागला. तो तयार करत असलेल्या ड्रग्जचा खूप घाण वास येत असल्याची तक्रार त्याच्या कंपनीतील कामगारांनी केली. त्यानंतर त्याने आपल्या कंपनीत ड्रग्ज तयार करणे बंद केले. परंतु, आपल्या संपर्कांचा उपयोग करून त्याने गुजरातच्या जीआयडीसीमध्ये असलेल्या इन्फिनिटी रिसर्च अँड डेव्हलपमेंट नावाच्या कंपनीत ड्रग्ज बनवण्याचे काम सुरूकेले. तेथे ड्रग्ज बनवून तो मुंबईतील नालासोपारा येथे एका गोदामात ठेवत असे आणि तेथूनच तो त्याची विक्री करत असे, अशी माहिती नलावडे यांनी दिली. टेलीग्रामवरून संपर्क ड्रग्जची विक्री करण्यासाठी सिहं हा प्रथम व्हाट्सअपवरून संपर्क साधत असे. त्यानंतर त्याने टेलीग्रामचा वापर सुरू केला. त्याने ड्रग्जची विक्री करण्यासाठी एक नियम बनवला होता. कोणाला ड्रग्जची खरेदी करायची असेल तर एक - दोन किलोची खरेदी न करत एकदम 25 किलोंची खरेदी करावी लागेल तरच तो ग्राहकाला ड्रग्ज देत असे. सिहं हा ड्रग्ज बनवत असताना खूपच काळजी घेत होता. कारण मार्केटमध्ये ड्रग्जची विक्री करणारे अनेक जण आहेत मग आपल्या ड्रग्जची कोण खरेदी करणार म्हणून तो स्वत:कंपनीत जाऊन ड्रग्जची तपासणी करत असे आणि चांगल्या गुणवत्तेवर भर देत असे.

# वर्ध्यात माणुसकीला काळीमा! सहा वर्षीय चिमुकलीवर अत्याचार



माणुसकीला काळीमा फासणारी घटना वर्ध्यात घडली आहे. वर्ध्याच्या सावंगी पोलिस ठाण्याच्या हद्दीत सहा वर्षीय चिमुलीवर अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेने जिल्हाभर संताप व्यक्त केला जात आहे. घटनेतील आरोपी पीडित मुलीचा शेजारी असून नेहमीप्रमाणे ती आरोपीच्या मुलासोबत खेळण्यासाठी गेली असता आरोपीने हे संताप जनक कृत्य केलं आहे. कुटुंबीयांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून या 40 वर्षीय नाराधमाला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार पीडित मुलीचे आणि आरोपीचे घर हे एकमेकांच्या शेजारी असून पीडित चिमुकली ही आरोपीच्या घरी त्याच्या मुलासोबत नेहमी खेळायला जायची. दरम्यान नेहमीप्रमाणे काल देखील ती आरोपीच्या घरी त्याच्या मुलासोबत खेळायला गेली होती. यावेळी 40 वर्षीय नराधम आरोपीने तिच्यावर अत्याचार केले. या घटनेत चिमुकली प्रचंड घाबरली होती. तिची आई आंघोळ घालण्यासाठी आरोपीच्या घरी तिला घ्यायला गेली असता तिला याबाबतची शंका आली. पीडितेच्या आईला संशय आल्याने तिने मुलीला विचारपूस केली असता संपूर्ण धक्कादायक प्रकार उघडकीस आला. पीडितेच्या आईने आरोपीला याबाबत विचारणा केल्यानंतर त्याने तिला शिवीगाळ केली. त्यामुळे पीडितेच्या आईने सावंगी मेघे पोलीस ठाण्यात संशयिताविरोधात तक्रार दाखल केली. आरोपीवर पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करून पोलिसांनी त्याला अटक केली आहे..

# टॉवरवर चढून तरुणाचा विष प्राशनचा प्रयत्न

यवतमाळ: एका गुन्ह्यात आरोपी असलेल्या तरुणाने हातात विषाची बाटली घेत तो टॉवरवर चढला. एवढेच नव्हे, तर येथील अवधूतवाडी ठाण्यातील पोलीस अधिकारी असलेल्या दाम्पत्यावर धमकी दिल्याचा आरोप करत त्याने विष प्राशनाचा प्रयत्न केला आहे. ही गंभीर घटना आज रविवारी दुपारी 4.30 वाजताच्या सुमारास पांढरकवडा येथील सुराणा जिनिंग परिसरातील वीज वितरण कार्यालयाच्या आवारात घडली. या घटनेने प्रशासनाची चांगलीच भंबेरी उडाली पांडुरंग श्रीकृष्ण मुतनेनवार (32) रा. सिंधी कॉलनी पांढरकवडा असे टॉवरवर चढून विष प्राशनाचा प्रयत्न करणाऱ्या तरुणाचे नाव आहे. काही दिवसांपूर्वी एका तरुणीची छेड काढल्याप्रकरणी नागरिकांनी त्याला चोप दिला होता. तसेच पीडित तरुणीच्या तक्रारीवरून त्याच्याविरुद्ध विनयभंगाचा गुन्हा येथील अवधूतवाडी पोलिसात दाखल झाला होता. तपासादरम्यान त्याला अटकही करण्यात आली होती.


पोलीस बातमी पत्र

ALL SCAN & PAY
ACCEPTED HERE

PhonePe
G Pay
Pay



हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898